


आय.सी.डब्ल्यू.ए. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा शनिवारी 'औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंटंट'तर्फे सत्कार करण्यात आला. या वेळी गुणवंतासह प्रमुख पाहुणे श्री. देशपांडे, सुभाष खडके, प्रा. पाटील, श्री. शुक्ला.

# औरंगाबादेतील दहा विद्यार्थी आयसीडब्ल्यूए परीक्षेत उत्तीर्ण

सकाळ वृत्तसेवा

औरंगाबाद, ता. १८: 'विषय शिकविताना प्रत्यक्ष व्यवहारात विषयाचा होणारा वापर व तर्काची सांगड घालावी व विद्यार्थ्यांनी नकारात्मक भूमिका सोडून अध्ययन करावे, असे प्रतिपादन देवगिरी महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. एस. डी. पाटील यांनी येथे केले.

आय.सी.डब्ल्यू. ए. (इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्कस् अकाऊंटंट्स ऑफ इंडिया) परीक्षेत औरंगाबादेतील दहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार 'औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाउंटंटस्'तर्फे शनिवारी (ता.१८) करण्यात आला. सरस्वती भुवन महाविद्यालयाचे प्रा. ए. बी. जोशी अध्यक्षस्थानी होते. 'सकाळ'चे कार्यकारी संपादक यमाजी मालकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. पाटील म्हणाले, आय.सी.डब्ल्यू.ए. व सी.ए. सारख्या स्पर्धात्मक परीक्षेत व्यवहारी व तार्किक दृष्टीने शिकलेले विद्यार्थी यशस्वी होतात. यावर्षी पहिल्यांदाच या परीक्षेत औरंगाबादला घवघवीत यश मिळाले, म्हणून पाटील यांनी 'चॅप्टर'चे अभिनंदन केले. श्री. मालकर व प्रा. देशपांडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. औरंगाबाद चॅप्टरचे सचिव राजेश शुक्ला यांनी पाहुण्यांचा परिचय तर 'चॅप्टर'चे अध्यक्ष सुभाष खडके व प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष ए. आर. जोशी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

शहरातील निखिल जोशी, संदीप कुलकर्णी, भरत आगवा, सिद्धार्थ भोयटे, संतोष मिश्रा, पंकज साहुजी, योगेश त्रिपाठी, अलोक लाटे, एस. आर. हानचटे, अमोल दागडिया हे विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष एन. आर. शर्मा, गिरीष कुलकर्णी, ए. सी. पाटील, एम. आर. पंडित, एस. आर. पिंपळे यांची उपस्थिती होती.